# प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नागपूर

## वन्यजीव डीएनए विश्लेषणासाठी नमुने गोळा करणे, जतन करणे आणि वाहतूक करणे.

| अनु क्र. | नमुन्याचा प्रकार | संरक्षक द्रावण | जतन | वाहतूक |
|---|---|---|---|---|
| 1 | Blood / रक्त | K3EDTA | 4ºC | Maintain cold chain, put in sterile plastic container<br>थंड तापमानात (बर्फात) ठेवून पाठवावे, निर्जंतुक केलेले प्लास्टिक डबी अथवा डबे वापरावे. |
| 2 | Blood stain / रक्त डाग | - | Room temperature | Pack in paper packet<br>कागदाच्या पाकिटात पाठवावे |
| 3 | Hair/feather/ केस / पंख | - | Room temperature | Pack in paper packet<br>कागदाच्या पाकिटात पाठवावे |
| 4 | Meat / मांस | Salt/saline/ethanol<br>मीठ/ मिठाचे द्रावण/ अल्कोहोल | 4ºC | Maintain cold chain, put in sterile plastic container<br>थंड तापमानात (बर्फात) ठेवून पाठवावे, निर्जंतुक केलेले प्लास्टिक डबी अथवा डबे वापरावे. |
| 5 | Bone/ivory/horn/ हाड / हस्तिदंत / शिंग | - | Room temperature | Pack in paper packet/cloth<br>कागदाच्या पाकिटात / कपड्यात गुंडाळून पाठवावे. |
| 6 | Dry Skin/ कोरडी त्वचा | - | Room temperature | Pack in paper packet/cloth<br>कागदाच्या पाकिटात / कपड्यात गुंडाळून पाठवावे. |
| DO NOT USE FORMALIN AS PRESERVATIVE FOR ANY SAMPLE<br>संरक्षण द्रावण म्हणून फोर्मालीन द्रावणाचा वापर कधीच करू नये. | | | | |

Scanned with CamScanner

**रक्त: प्राण्याचे शव किंवा जिवंत प्राण्यापासून काढलेले रक्त**

i. जिवंत प्राण्याला पशुवैद्यकांच्या उपस्थितीत भूल दिली पाहिजे आणि रक्त गोळा करण्याचे काम प्रशिक्षित तंत्रज्ञांनी केले पाहिजे.

ii. गोळा केलेले रक्त ताबडतोब K3EDTA असलेल्या फायल मध्ये हस्तांतरित केले जावे आणि नाव, वय, प्राण्याचे लिंग, तारीख आणि गोळा करण्याचे ठिकाण निर्दिष्ट करणारे लेबल लावावे.

iii. रक्ताचा नमुना असलेली फायल बर्फाच्या पेटीत / रेफ्रिजरेटरमध्ये हस्तांतरित करेपर्यंत साठवायची.

iv. तंत्रज्ञ आणि इतर कर्मचाऱ्यांनी नेहमी हातमोजे आणि मास्क घालावे आणि संकलन करण्यापूर्वी आणि नंतर त्यांचे हात स्वच्छ करणे आवश्यक आहे.

v. न्यायवैद्यक प्रयोगशाळेत नमुन्याची वाहतूक शक्य तितक्या लवकर बर्फाच्या पॅकमध्ये आणि नमुन्याचे नुकसान होणार नाही अशा प्रकारे केली जावी.

**रक्ताचे डाग: रक्ताचे डाग असलेली सामग्री म्हणजे माती, वनस्पतींचे भाग, कपडे, शस्त्रे.**

i. कागदी पिशवीत / पाकिटात रक्तमिश्रित माती गोळा करा आणि सील करा.

ii. झाडाचे रक्ताने माखलेले भाग सावलीत वाळवा आणि कागदाच्या पॅकेटमध्ये ठेवा.

iii. शस्त्रांवरून रक्ताचे स्क्रॅपिंग गोळा केले जाऊ शकते (गंज मिसळू नये म्हणून जोराने स्क्रॅप करू नका) आणि कागदाच्या पाकिटामध्ये पाठविले जाऊ शकते.

iv. नमुना दूषित होऊ नये म्हणून कर्मचाऱ्यांनी नेहमी हातमोजे घालावे कारण रक्ताचे डाग असल्यास नमुना खूपच कमी असू शकतो.

**केस/ पंख: प्राण्यांचे केस किंवा पक्ष्यांची पिसे**

i. केसांच्या शाफ्टची मुळे किंवा पिसाचा कॅलॅमस अबाधित राहतील यासाठी चीमटयाच्या सहायाने ते उपटून काढावे. "केस किंवा पंख तोडू, कापू नका".

ii. नमुना स्वच्छ कागदाच्या पॅकेटमध्ये हस्तांतरित करा आणि योग्यरित्या लेबल करा

iii. नमुना संकलनासाठी नेहमी हातमोजे वापरा.

iv. केसांच्या बेसल भागाला किंवा पंखांना स्पर्श करणे टाळा.

**शिंग / हस्तिदंत / बोन: आयव्हरी / जळलेली हाडे/ प्राण्याची हाडे**

i. हाड किंवा शिंग किंवा हस्तिदंताचा तुकडा घ्या आणि कोणत्याही बाह्य अशुद्धी काढून टाकण्यासाठी स्वच्छ, कोरड्या कापडाने पुसून टाका.

ii. नमुना आकाराने मोठा असल्यास, अल्कोहोलने निर्जंतुक केलेल्या फाइलरचा वापर करून त्याचे लहान तुकडे केले जाऊ शकतात.

iii. एकापेक्षा जास्त नमुने असल्यास, नमुन्यांच्या दरम्यान फाइलर पूर्णपणे स्वच्छ केले पाहिजे.

iv. नमुना कागदाच्या पॅकेटमध्ये ठेवा आणि योग्यरित्या लेबल करा.

v.नमुना संकलनासाठी नेहमी हातमोजे वापरा.

Scanned with CamScanner

## मांस: शिजवलेले, अर्धवट शिजवलेले किंवा कच्चे मांस.

i.मांसाचा तुकडा निर्जंतुकीकरण केलेल्या ब्लेडने कापून टाका.

ii.अनेक नमुने असल्यास, नमुन्यां दरम्यान ब्लेड पूर्णपणे स्वच्छ निर्जंतुक केले पाहिजे.

iii.निर्जंतुकीकरण कंटेनरमध्ये मीठ किंवा इथेनॉलसह संरक्षक द्रावणामध्ये मांसाचा तुकडा ठेवा आणि योग्यरित्या लेबल करा.

iv.नमुना बर्फाच्या पेटीत थोड्या काळासाठी किंवा जास्त काळ 4◦C वर साठवा.

v.बर्फाच्या पॅकमध्ये शक्य तितक्या लवकर नमुन्याची फॉरेन्सिक प्रयोगशाळेत वाहतूक करणे.

vi.नमुना संकलनासाठी नेहमी हातमोजे घाला.

## त्वचा / चामडी

i.वापरण्यापूर्वी कात्री किंवा ब्लेड अल्कोहोलने स्वच्छ केले पाहिजेत.

ii.अंदाजे 5 सेमी त्वचा कट करा.

iii.त्वचेचा तुकडा कागदाच्या पॅकेटमध्ये ठेवा आणि योग्यरित्या लेबल करा.

iv.नमुना संकलनासाठी नेहमी हातमोजे घाला.

नमुन्यावरील लेबलमध्ये खालील माहिती असावी:
C.R. क्र. किंवा P.O.R. न. आणि तारीख.
प्राण्याचे नाव (जर माहित असेल तर)
वय
लिंग आणि मुद्देमालाचे वर्णन, संख्या, आकार व नमुन्याचे स्वरुप
नमुना संकलनाची तारीख
नमुना संकलनाचे स्थान
संबंधित कार्यालयाचा शिक्का
जप्ती घेतलेल्या तपासी अधिकारी/ पशुवैद्यकीय डॉक्टर यांचा शिक्का आणि स्वाक्षरी

श्रीमती.वै.भु.महाजन
सहायक संचालक
प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,
नागपूर
दुरध्वनी क्र. 0712-2462879
मो.न.9881022939

डॉ.वि.ज.ठाकरे
उपसंचालक
प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,
नागपूर.

Scanned with CamScanner